| Sr. No | Student Name | Placement/ Progression to HE | Name of the Employer/ HE Institution | Pay Package/ Program |
|---|---|---|---|---|
| 1. | Sapkal Kiran Shankar | Placement | Education Deputy Officer | 11,00,000 |

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**क्रमांक :** 1477[2]/2021/चौस **बैठक क्रमांक :** **दिनांक :** 23 जून, 2023

प्रति ,

**KIRAN SHANKAR SAPKAL (00303120220504220001369)**

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-2021 नियुक्तीसाठी शिफारशी करण्याबाबत.**

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास असे कळविण्यात येते की, राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-2021 च्या दिनांक 15 जून, 2023 रोजी जाहीर केलेल्या अंतिम निकालातील आपला गुणवत्ताक्रम व आपण विविध पदांसाठी दिलेला पसंतीक्रम विचारात घेऊन आपली **DEPUTY EDUCATION OFFICER, MAHARASHTRA EDUCATION SERVICE (ADMINISTRATION BRANCH), GROUP-B** या पदावर नियुक्तीकरिता अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (13ब), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400 032 / प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग (नवि-4), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400 032 यांच्याकडे शिफारस करण्यात आली आहे.

2. राज्य सेवा परीक्षेद्वारे नियुक्त होणा-या गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांचा एकत्रित प्रशिक्षण कार्यक्रम शासनाकडून आयोजित करण्यात येईल. याबाबतचा तपशील आपणास शासनाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

3. सदर परीक्षेच्या जाहिरातीत काही पदांकरिता विशिष्ट शैक्षणिक अर्हता व शारिरिक मानके विहित करण्यात आली आहेत. अशा पदावर शिफारस झाली असल्यास त्याबाबतची अट पूर्तता करीत असल्याबाबत अशा उमेदवारांच्या नियुक्तीकरिता विचार करण्यात येईल. अन्यथा नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून नियुक्ती रद्द करण्यात येईल याची आपण नोंद घ्यावी.

4. आपण प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने सदर परीक्षेच्या जाहिरातीतील विहित केलेल्या तरतुदीनुसार आपली सर्वकष पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरुन शासनाकडून / शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासण्याच्या अधीन राहून आपली शिफारस करण्यात आली आहे. तपासणीअंती आपण प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा अर्जातील दाव्यानुसार आपण आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास / विहीत पात्रतेच्या अटींची पूर्तता करीत नसल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर आपली शिफारस / नियुक्ती रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

5. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या, अनाथ आरक्षणाच्या व अन्य मुद्दासंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

6. आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर असलेला साक्षांकन नमुना डाऊनलोड करुन आणि संपूर्ण भरुन तो अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (13-ब) मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400032 / प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, (नवि-4) मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400 032 यांच्याकडे तात्काळ परस्पर पाठवावा. साक्षांकन नमुन्यातील अटक, शिक्षा, दंड व इतर कारवाई इत्यादींची माहिती संबंधित रकान्यात होय किंवा नाही या उत्तराने भरावी. अन्यथा साक्षांकन नमुना स्वीकारला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

23-06-2023 03:49:22 1

1/2

7. नियुक्ती संदर्भातील पुढील सर्व पत्रव्यवहार उपरोक्त प्राधिकाऱ्याकडेच करण्यात यावा.

आपला विश्वासू ,

(सु. सु. [illegible])
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

# Translated version

GOVERNMENT OF MAHARASHTRA Maharashtra Public Service Commission Kiran Shankar Sapkal Subject Regarding Recommendation for Appointment in State Services Main Examination 2021 Sir Regarding the above subject, you are hereby informed that taking into account your merit order in the final result of State Services Examination 2021 declared on 15th June 2023 and the order of preference given by you for various posts. For the post of Deputy Education Officer Maharashtra Education Service Administration Branch Group B it is recommended to the Chief Secretary Government of Maharashtra General Administration Department Madam Kama Marg Hutatma Rajguru Chowk Ministry Mumbai All further correspondence regarding the appointment should be addressed to the above authority Yours faithfully Secretary Maharashtra Public Service Commission Mumbai

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati